# बिल्डरांचा दंड माफ करणाऱ्या नगरसेवकांना निवडणुकीत घरी बसवा

## ▪ विविध स्वयंसेवी संस्थांची टीका

पुणे, दि. १९ (प्रतिनिधी) – महापालिकेला उत्पन्नाची बोंबाबोब सुरू असताना, भोगवटा प्रमाणपत्र न घेणाऱ्या बिल्डरांचा कोट्यवधीचा दंड माफ करून सर्वसामान्य नागरिकांवर पाणीपट्टीचा बोजा लादणाऱ्या नगरसेवकांना आगामी महापालिका निवडणुकीमध्ये घरी बसवा, असे आवाहन विविध स्वयंसेवी संस्थांनी केले आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना दंड माफ करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्याची घाई नगरसेवकांना का झाली, हे न समजण्याइतकी जनता दूधखुळी नाही, असा टोलाही लगावला आहे.

बांधकाम व्यावसायिकांचा दंड माफ करण्याच्या सर्वसाधारण सभेच्या निर्णयावर स्वयंसेवी संस्थांनी टीकेची झोड उठविली. सजग नागरिक मंचाचे विवेक वेलणकर, विश्वास सहस्रबुद्धे, ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर, पीएमपी प्रवासी मंचाचे जुगल राठी, नागरी चेतना मंचचे सुधीर जठार, ग्राहक पेठेचे सूर्यकांत पाठक, नागरी हक्क समितीचे सुधीर कुलकर्णी यांनी या निर्णयाचा निषेध केला आहे. मूठभर बांधकाम व्यावसायिकांसाठी दंड माफ, पुणेकरांना मात्र पाणीपट्टीवाढ, कंत्राटदारांना हप्त्याने पैसे, मिळकतकर मात्र दोन हप्त्यांत, न्यायालयात खटला प्रलंबित असताना नगरसेवकांनी दंड माफ करण्याचा प्रस्ताव आणून मंजूर करण्याची घाई का झाली? हे न समजण्याइतके पुणेकर दुधखुळे नाहीत, अशी टीकाही केली आहे.

पुणेकरांचे नुकसान होणारे सर्व निर्णय रद्द करण्याची मागणी करणार असल्याचे माजी नगरसेवक उज्ज्वल केसकर, सुहास कुलकर्णी, शिवसेनेचे प्रशांत बधे यांनी कळविले आहे.

### ३०० कोटींचा दंड माफ

▪ शहरात २४ तास पाणीपुरवठा योजना राबविण्यासाठी पाणीपट्टीत वाढ करण्यात आली. या पाणीपट्टीतून सुमारे ४० कोटींचे उत्पन्न मिळणार आहे. त्याच लोकप्रतिनिधींनी बांधकाम व्यावसायिकांचा सुमारे ३०० कोटींचा दंड माफ करण्याचा निर्णय घेतला आहे.